प्रेसनोट दिनांक १८/०५/२०१९

## बंडगार्डन पोलीस स्टेशन

### बंडगार्डन पोलीसांकडून मिसींग मुलीस दिले नातेवाईकांचे ताब्यात.

दिनांक १४/०५/२०१९ रोजी सायंकाळी ०६.०० चे सुमारास अल्पवयीन मुलगी,वय- १५ वर्ष रा.ताडीवाला रोड ही सायंकाळी अचानकपणे घरातुन गायब झाली,घरातील मुडळींनी तिचा ताडीवाला रोड परीसर,स्टेशन परीसरात तसेच मैत्रिणी,नातेवाईक यांचेकडे शोध घेतला परंतु तीचा काहीच शोध लागत नव्हता. त्यानंतर तिच्या आईने ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे मुलगी सापडत नसले बाबत तक्रार दिली होती. त्यानंतर ताडीवाला रोड चौकीचे सहा.पोलीस निरीक्षक, देशमुख यांनी तात्काळ पोलीसांची दोन पथके तयार केली व मुलीचा शोध सुरु केला, त्यावेळी सपोनि.देशमुख व त्यांचे पथकातील पोलीस शिपाई सावंत यांनी शोध घेत असताना मिसिंग मुलगी हि तीचे मैत्रिणीकडे चौकशी केली असता,ती सध्या शिवाजीनगर बस स्थानक येथे असल्याचे सांगितले होते. तात्काळ शिवाजी नगर बस स्थानक येथे पुरुष व महिला कर्मचारी पाठवुन फोटोद्वारे मुलीस ओळखुन ताब्यात घेतले,व चौकी येथे आणुन,सदर मुलीस तीचे आईचे ताब्यात दिले. आपली मुलगी सुखरुप मिळाल्याबद्दल त्यांनी पोलीसांचे आभार मानले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे